कोषागारातून रोख्र देणे
दि. १३ ऑगस्ट, २००७

पाणी पुरवठा योजनांसाठी उभारलेल्या कर्जरोखे व कर्जावरील व्याजाच्या परतफेडीसाठी अनुदान

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. २४/पापु ०८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ८ ऑगस्ट, २००७

वाचा :-

१) शासन निर्णय, पा. पु. व स्व. वि., क्र. पापुधो ११९७/प्र.क्र.१६०/पापु ०४, दि. ३ डिसेंबर, १९९७.
२) शासन निर्णय, क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. २४(१)/पापु ०८, दिनांक :- ९ एप्रिल, २००७
३) शासन निर्णय, क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. २४(२)/पापु ०८, दिनांक :- ९ एप्रिल, २००७
४) शासन निर्णय क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. २४(३)/पापु ०८, दिनांक :- ९ एप्रिल, २००७
५) शासन निर्णय क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. ४४/पापु ०८, दिनांक - ३१ मे २००७
६) शासन निर्णय क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. ४४/पापु ०८, दिनांक - १४ जून २००७
७) शासन निर्णय क्र. बॉण्डी २००७/प्र.क्र. ४४/पापु ०८, दिनांक :- ५ जुलै २००७

प्रस्तावना :-

राज्यातील ग्रामीण व नागरी पाणीपुरवठा योजनांसाठी शासनाकडून देय असलेल्या अनुदानाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त नियोजन [illegible] दरवर्षी मंजूर केलेल्या नियतव्ययाच्या मर्यादेत [illegible] बाजारातून कर्जरोखे उभारुन व वित्तीय संस्थाकडून कर्ज घेऊन निधी उभारण्यास, शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.पापुधो ११९७/ प्र.क्र.१६०/ पापु-०४, दिनांक ३ डिसेंबर १९९७ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राधिकृत केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सन १९९७ ते मार्च २००६ पर्यंत उभारलेल्या कर्जरोखे व कर्जावरील मुद्दल, व्याज व इतर शुल्काच्या परतफेडीसाठी सन २००७-०८ करिता रु. ७६५,९०,२५,०००/- एवढी अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सदर तरतुदीपैकी रु.५९०,०८,०४,०५१/- (रुपये पाचशे नव्वद कोटी आठ लाख चार हजार एकावन्न फक्त) एवढे अनुदान आता पर्यंत वितरीत करण्यात आले आहे. कर्जरोखे कर्जावरील दि. ३१/८/२००७ रोजी देय होणारे मुद्दल व व्याजाच्या परतफेडीसाठी अनुक्रमे रु. २६,४८,९३,०००/- व रु. २,११,३८,१४१/- व मालिका - ८ वरील दि. १.९.२००७ रोजी देय होणाऱ्या व्याजाच्या परतफेडीसाठी रु.३,५३,५५,२५०/- एवढे अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्जरोखे कर्जावरील दि. ३१/८/२००७ रोजी देय होणारे मुद्दल व व्याजाच्या परतफेडीसाठी अनुक्रमे रु. २६,४८,९३,०००/- व रु. २,११,३८,१४१/- व मालिका -८ वरील दि १.९.२००७ रोजी देय झालेले रु. ३,५३,५५,२५०/- व्याजावरील सर्व [illegible] एकूण रु.३२,१३,८६,३९१/- (रुपये [illegible] कोटी तेरा लाख शहाऐंशी हजार तीनशे एक्याण्णव फक्त) **एवढे अनुदान सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना खालील अटींवर रोख्र मुक्त करण्यात येत आहे.**

१) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी वरील मंजूर रकमेच्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.
२) ही मंजूर रक्कम ज्यासाठी उपलब्ध करुन दिलेली आहे त्याच विशिष्ट कारणासाठीच खर्च करावी. तसेच ही रक्कम अन्य कोणत्याही कारणासाठी वापरली जाणार नाही याची दक्षता घ्यावी. याबाबतची माहिती शासनास द्यावी.
३) वरील मंजूर केलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचे लेखे तपासणीचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई/ नागपूर यांना किंवा त्यांच्या अधिकार क्षेत्रातील निम्नस्तरीय अधिकारी यांना देण्यात येत आहेत. तसेच याबाबतची संबंधित कागदपत्रे, महालेखापाल किंवा त्यांच्या अधिकार क्षेत्रातील अधिकारी यांनी मागणी केल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्वरित उपलब्ध करुन द्यावी.
४) या मंजूर अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राधिकरणाने द्यावयाची आहेत. त्यात दर्शविलेल्या खर्चाच्या रकमा प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी [illegible] करुन प्रमाणित कराव्यात व ती प्रमाणपत्रे प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी प्रतिस्वाक्षरीत करावयात. उपयोगिता प्रमाणपत्राच्या प्रती महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर आणि अधिदान व लेखा अधिकारी यांना पाठविण्यात याव्यात.

५) या मंजूर अनुदानातून केलेल्या कामांच्या त्रैमासिक प्रगतीचा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने [illegible] व त्याचबरोबर [illegible] या विभागाकडे (कार्यासन क्र. पापु १०) पाठवावा. तसेच दरमहा प्राधिकरणातून करावयाची [illegible] प्रपत्रात [illegible] या विभागाकडे पाठवावी.

२. वर नमूद करण्यात आलेले अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किंवा प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, श्री. [illegible] यांच्या सहीने तयार केलेले व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील उप सचिव, श्री. [illegible] यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना सादर करावे. अधिदान व लेखाधिकारी यांनी सदर देयकातील मंजूर रक्कम शासनाने [illegible] धनादेशाद्वारे अदा करावी. सदर धनादेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचे नावे काढण्यात यावा. उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना प्राधिकरणाने सादर केलेल्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

३. परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु. ३९,१३,८९,४९७/- चे अनुदान लेखाशीर्ष, "मागणी क्र.वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता ०१, पाणी पुरवठा-१९१-स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादींना सहाय्य (०१)(०६) [illegible] व वित्तीय व इतर संस्थाकडून घेतलेल्या कर्जावरील [illegible] महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सहायक अनुदान (योजनेतर) (२२१५ १९०७) ३१ सहायक अनुदान" खाली, या वर्षी उपलब्ध अनुदानातून भागवावा व या [illegible] खर्ची टाकावा. तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अर्थसं-२००७/प्र.क्र.१३१/अर्थसंकल्प-५, दि. १५ मे २००७ अन्वये [illegible] आवश्यकता राहणार नाही.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. [illegible]-२००७/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प, दि. २ जून २००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०८०८१६,२१२२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.गो.भोईर)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
२. महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर.
३. महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखापरीक्षा) मुंबई
४. महालेखापाल, महाराष्ट्र -२ (लेखापरीक्षा) नागपूर.
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई -२१
६. वित्तीय सल्लागार व मुख्यलेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , सिडको भवन बेलापूर, नवी मुंबई.
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
९. वित्त विभाग(अर्थसंकल्प-१९/व्यय-३/ अर्थोपाय/ अर्थसंकल्प)
१०. सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११. कार्यासन पापु २०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१२. निवडनस्ती -पापु ०८,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
१३. [illegible] कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२